लोकपत्र दि. 12.8.25

# पोलिसांच्या तत्परतेने एका युवकाचा जीव वाचला

## सायबर सेलच्या मदतीने २० मिनिटांत शोध लागला

**नायगाव/ता.प्रतिनिधी**

रामतीर्थ पोलीस स्टेशनचे सपोनी विक्रम हराळे यांच्या तात्काळ हालचाली आणि सायबर सेलच्या सहकार्यामुळे बेशुद्ध अवस्थेत गंभीर जखमी झालेल्या युवकाचा वेळीच शोध लागून त्याचे प्राण वाचवले गेले. त्यांच्या या कर्तव्यपरायण आणि तत्पर सेवेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

किनाळा (ता. बिलोली) येथील आनंदा परशुराम उगे (वय ३२) हे दि. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजेपासून बेपत्ता झाले होते. ते घरी न परतल्याने त्यांच्या नातेवाईकांनी व गावकऱ्यांनी शोधाशोध सुरू केली. त्यांचा मोबाईल फोन लागत होता मात्र त्यांनी तो उचलत नव्हता त्यामुळे नातेवाईकांची चिंता अधिक वाढली.रात्री ११:४० वाजता नातेवाईक व गावचे सरपंच विठ्ठल माने यांनी रामतीर्थ पोलीस ठाण्यात हजर होऊन आनंदा बेपत्ता असल्याची माहिती दिली. याची गंभीर दखल घेत सपोनी विक्रम हराळे यांनी सायबर सेलच्या मदतीने केवळ २० मिनिटांत मोबाईल लोकेशनद्वारे आनंदाचा माग काढला.

सदर माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम राबवून आनंदा उगे यांना नांदेड-देगलूर राज्य महामार्गावरील धुप्पा-किनाळा दरम्यान अंधारात, रस्त्याच्या कडेला बेशुद्ध अवस्थेत व गंभीर जखमी स्थितीत सापडले. प्राथमिक अंदाजानुसार त्यांना अज्ञात वाहनाने धडक दिली असावी. त्यांना तातडीने नायगाव येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर गंभीर स्थितीमुळे पुढील उपचारासाठी नांदेड येथील खाजगी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

जर वेळेवर शोध न लागता आनंदा रात्रभर तसाच अंधारात पडून राहिला असता, तर त्याचा जीव गमावण्याची शक्यता होती. मात्र सपोनी विक्रम हराळे यांच्या प्रसंगावधानामुळे आणि सायबर सेलच्या तत्काळ प्रतिसादामुळे एक अनमोल जीव वाचला. त्यांच्या या तत्पर व संवेदनशील कार्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.